

# १. विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गासाठीच्या आश्रमशाळा

## आश्रमशाळा नाही, हे तर माझं दुसरं घर, जिथे माझ्या स्वप्नांना मिळते नवी नजर.

महाराष्ट्रातील विमुक्त जाती, भटक्या जमाती या संवर्गातील बरेच लोक आपला उदरनिर्वाह करण्यासाठी एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी भटकत असतात. त्यामुळे त्यांच्या मुलांना शिक्षणापासून वंचित राहावे लागते. त्यामुळे या संवर्गातील मुला-मुलींसाठी मोफत निवास, भोजन, शालेय साहित्य व अंथरुण-पांघरुण इत्यादी सोयी उपलब्ध करुन दिल्यास आणि व्यक्तिगत लक्ष दिल्यास त्यांच्या शिक्षणावर चांगला परिणाम होईल या दृष्टीकोनातून या मुलांसाठी खास स्वतंत्र आश्रमशाळा अनुदान देऊन स्वयंसेवी संस्थांमार्फत सुरु करण्याची योजना सन १९५३-५४ पासून अस्तित्वात आली. विमुक्त जाती भटक्या जमाती कल्याण समितीने केलेल्या शिफारशी, विमुक्त जाती भटक्या जमाती यामध्ये वेळोवेळी समाविष्ट करण्यात आलेल्या जातीची संख्या लक्षात घेता, शासनाने निवासी आश्रम उघडण्यासाठी तयार केलेल्या बृहत आराखड्यानुसार आश्रम शाळांना मान्यता देण्यात येते. या आश्रमशाळांतून विद्यार्थ्यांना शासनाकडून मोफत निवास, भोजन, शालेय साहित्य गणवेश (वर्षातून दोनदा) व अंथरुण-पांघरुण इत्यादी सोयी सुविधा पुरविल्या जातात.

महाराष्ट्रातील विमुक्त जाती आणि भटक्या जमाती तसेच ऊसतोड कामगारांच्या मुलासाठी निवासी शिक्षण मिळावे आणि त्यांची सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिकप्रगती व्हावी, या उद्देशाने खाजगी संस्थांना अनुदाने देऊन आश्रम शाळा योजना शासनाकडून राबविण्यात येतात. राज्यात विजाभज प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांसाठी ५३०-प्राथमिक आश्रमशाळा, २९७-माध्यमिक आश्रमशाळा व १४८-उच्च माध्यमिक आश्रमशाळा, त्याचप्रमाणे उसतोड कामगारांच्या मुला- मुलींसाठी बीड जिल्हया मध्ये ४ आश्रमशाळा चालविल्या जातात. याशिवाय लातूर विभागातील नांदेड जिल्ह्यात १ विद्यानिकेतन शाळा चालविली जाते.

## इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या अंतर्गत सुरुअसलेल्या खाजगी अनुदानित विजाभज आश्रम शाळा माहिती

| अ.क्र | विभागाचे नाव | जिल्ह्याचे नाव | आश्रम शाळांची संख्या | निवासी विद्यार्थी संख्या | | | अनिवासी विद्यार्थी संख्या | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | प्रवेशित निवासी विजाभज विद्यार्थी संख्या | प्रवेशित निवासी विजाभजोत्तर विद्यार्थी संख्या | एकूण (३+४) | प्रवेशित अनिवासी विजाभज विद्यार्थी संख्या | प्रवेशित अनिवासी विजाभजोत्तर विद्यार्थी संख्या (१५ संख्या मर्यादेत) | प्रवेशित विजाभजोत्तर विद्यार्थी संख्या (१५ संख्या मर्यादेत) | एकूण (६+७+८) |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १. | मुंबई विभाग | ठाणे | १ | ११२ | ८ | १२० | ० | १५ | ३ | १८ |
| | | ठाणे | १ | १०४ | १६ | १२० | १६ | ७७ | ५ | ९८ |
| | | रायगड | १ | २९ | ५७ | ८६ | ० | ० | ० | ० |
| | | रत्नागिरी | ६ | ३७९ | २१७ | ६०६ | ६७ | १५८ | ५७ | २८२ |
| | | सिंधदुर्ग | १ | ४३ | १८ | ६१ | ० | ० | ० | ० |
| | | मुंबई एकूण विभाग | १० | ६६७ | ३१६ | ९९३ | ८३ | २५० | ६५ | ३९८ |
| २. | पुणे विभाग | सोलापूर | ९७ | ८४०३ | २२१३ | १०६१६ | ४६१४ | ४६२१ | ३९९७ | १३२३२ |
| | | सातारा | ३३ | २४८७ | ९१७ | ३४०४ | ६०२ | ९०४ | ११९ | १६२५ |
| | | पुणे | २८ | २७७९ | ४८० | ३२५९ | १०९४ | ९७९ | ५९८ | २६७१ |
| | | सांगली | ४३ | ३७४३ | १०८९ | ४८३२ | २८६९ | २४११ | १६६५ | ६९०४ |
| | | कोल्हापूर | २३ | १४८१ | ६७८ | २१५९ | ३२१ | ५२२ | १२५ | ९६८ |
| | | पुणे एकूण विभाग | २२४ | १८८९३ | ५३७७ | २४२७० | ९५०० | ९४३७ | ६५०४ | २५४०० |
| ३. | नाशिक विभाग | नंदुरबार | ६ | ५७९ | १०१ | ६८० | ४३५ | २९९ | ८२ | ८१६ |
| | | धुळे | २६ | २६८६ | ४७४ | ३१६० | १३६६ | ३९० | ६६७ | २४२३ |
| | | नाशिक | २८ | २४९५ | ७९१ | ३२८६ | ८७० | ९५५ | ४८१ | २३०६ |
| | | अहमदनगर | २६ | २३४३ | ५९३ | २९३६ | १३५६ | ३९६ | ५०५ | ५१९३ |
| | | जळगाव | ४८ | ४८३३ | ७९८ | ५६३१ | ६०९९ | २६६७ | १४७७ | १०२४३ |
| | | नाशिक विभाग एकूण | १३४ | १२९३६ | २७५७ | १५६९३ | १०१२६ | ४७०७ | ३२१२ | २०९८१ |
| ४. | औरंगाबाद | छत्रपती संभाजी नगर | ३८ | ३७०३ | ७६७ | ४४७० | ३३३० | १७५९ | ९९७ | ६०८६ |
| | | जालना | २१ | १९१५ | ३६९ | २२८४ | ११२२ | ९२३ | ६९३ | ४९८२ |
| | | बीड | ४५ | ५६०८ | २२२ | ५८३० | ३८८२ | २०३० | १४९८ | ७४१० |
| | | परभणी | ४० | ४००६ | ४१६ | ४४२२ | ३३५८ | २०२६ | १२८० | ६६६४ |
| | | औरंगाबाद विभाग एकूण | १४४ | १५२३२ | १७७४ | १७००६ | ११६९२ | ६७३८ | ४४६८ | २५१४२ |
| ५. | लातूर | हिंगोली | २० | २०११ | २६५ | २२७६ | ११६४ | १२५४ | १८५ | ४६९४ |
| | | धाराशिव | ३८ | ३३९६ | ७४४ | ४१३७ | ११८९ | १३९० | ३३६ | २९१५ |
| | | नांदेड | ९० | ८६९३ | १५११ | १०२०४ | ५०८३ | ४२७९ | २६९२ | १२०५४ |
| | | लातूर | ७७ | ७३९८ | १६३९ | ९०३७ | ५८४३ | ४४३२ | २६३० | १२९०५ |
| | | लातूर विभाग एकूण | २२५ | २१४९५ | ४१५९ | २५६५४ | १३२७९ | ११३५५ | ५८४३ | ३२५६८ |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६. | अमरावती | **अमरावती** | १४ | ११८१ | ४३४ | १६१५ | ९७ | ३६५ | ३०६ | ७६८ |
| | | **अकोला** | २१ | १५७७ | ४३० | २००७ | ३४७ | ३६८ | ३१५ | १०३० |
| | | **बुलढाणा** | २४ | २१०७ | ६६३ | २७७० | ४८८ | ४४९ | ५८ | ९९५ |
| | | **यवनमाल** | ८० | ७२५४ | १५२० | ८७७४ | ४२०८ | ३१६६ | २३७९ | ९७५३ |
| | | **वाशिम** | २६ | २०३२ | ६५८ | २६९० | ७५४ | ९८५ | १३८ | १८७७ |
| **अमरावती विभाग एकूण** | | | १६५ | १४१५१ | ३७०५ | १७८५६ | ५८९४ | ५३३३ | ३१९६ | १४४२३ |
| ७. | नागपूर | **नागपूर** | १७ | ९३० | ६९६ | १६२६ | २३८ | ३६६ | ७६ | ६८० |
| | | **वर्धा** | ५ | ३८१ | १८९ | ५७० | ० | २० | ० | २० |
| | | **भंडारा** | ४ | ९१ | २३० | ३२१ | ० | ५६ | ० | ५६ |
| | | **गोंदिया** | १० | ५८२ | ५१३ | १०९५ | १० | २२६ | ३ | २३९ |
| | | **चंद्रपूर** | ३१ | २५३० | १००२ | ३५३२ | ८४८ | ९८६ | ३३८ | २१७२ |
| | | **गडचिरोली** | ११ | ६१३ | ५५० | ११६३ | ५४ | ६८ | ६ | १२८ |
| **नागपूर विभाग एकूण** | | | ७८ | ५१२७ | ३१८० | ८३०७ | ११५० | १७२२ | ४२३ | ३२९५ |
| **मुंबई+पुणे+ नाशिक+औरंगाबाद+लातूर+ अमरावती+नागपूर)एकूण** | | | ९८० | ८८५०१ | २१२६८ | १०९७७९ | ५१७२४ | ३९५४२ | २३७११ | १२२२०७ |

अशाप्रकारे राज्यातील ७ विभागात एकूण ९८० आश्रमशाळा असून त्यामधून विमुक्त जाती भटक्या जमाती प्रवर्गाचे २,३१,९८६ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत त्यापैकी १,०९,७७९ विद्यार्थी निवासी शिक्षण घेत आहेत.

योजनेच्या अटी :

१. स्वयंसेवी संस्था ही सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त कायदा अधिनियम १९५० अन्वये नोंदणीकृत संस्था असावी.

२. संस्थेवर तसेच संस्थेच्या पदाधिकाऱ्यांवर कोणत्याही प्रकारचा पोलीस गुन्हा सिध्द होऊन शिक्षा झालेली नसावी.

३. संस्था आश्रमशाळा चालविण्यास आर्थिकदृष्ट्या सक्षम असावी.

४. प्रवेशित/लाभधारक विद्यार्थी हा महाराष्ट्राचा रहिवाशी असावा.

५. लाभधारक मुलगा / मुलगी हे विजाभज प्रवर्गातील असावे.

**लाभाचे स्वरूप :**

१) या योजनेंतर्गत मुलामुलींसाठी मोफत निवास, भोजन व शिक्षण देण्यात येते. त्याचप्रमाणे बिछाना शालेय साहित्य, गणवेश, क्रमिक पुस्तके व वैद्यकीय सुविधा देण्यात येते.

२) या आश्रमशाळा चालविणाऱ्या स्वयंसेवी संस्थेस दरमहा दरडोई मान्य निवासी विद्यार्थ्यांसाठी रु. १५००/– प्रमाणे परिपोषण अनुदान तसेच इमारत भाडे व मान्य निवासी कर्मचाऱ्यांवर ८% व १२% वेतनेतर अनुदान देण्यात येते.

३) विजाभज आश्रमशाळेतील शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी निपुण भारत योजने अंतर्गत शिक्षकांना प्रशिक्षण देऊन विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे भविष्यवेधी शिक्षण देण्याचे नियोजन व त्याद्वारे शिक्षणाचा दर्जा उंचावण्यात येत आहे.

४) आश्रमशाळांमध्ये निवासी विद्यार्थ्यांसह अनिवासी विद्यार्थ्यांनाही शिक्षण देण्यात येते.

- **सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी संपर्क :– संबंधित जिल्ह्याचे सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण विभाग**
- **शासन निर्णय क्रमांक :– विभशा–२००२/प्र.क्र.३९/मावक–६ दिनांक :– १६ ऑक्टोबर, २००३. सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभाग**